| MHSN060018402023 | PWDVA Appln./61/2023<br>Sou.Madhuri Rushikesh Kadam Vs.<br>Rushikesh Balasaheb Kadam,etc.2 |
|---|---|

## निशाणी ५ वरील आदेश

यातील अर्जदार हिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कलम २३ प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जास जाबदार नं. १ ते ३ यांनी निशाणी १५ प्रमाणे आपले म्हणणे दाखल केलेले आहे.

०२. अर्जदारतर्फे वकिल श्री. एस. एस. वाटवे आणि जाबदारतर्फे वकिल श्री. एम. व्ही. कोरे यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार हिची अर्जातील कथने, जाबदार याचे म्हणण्यातील कथने यांचा विचार करता खालीलप्रमाणे मुद्दे विचारार्थ आले. त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसासह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | अर्जदार ही तिच्यावर जाबदार यांनी कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले ही बाब प्रथमदर्शनी शाबीत करते काय ? | **होकारार्थी** |
| ०२ | अर्जदार ही तिच्या मागणी प्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | **अशंतः होकारार्थी** |
| ०३. | अर्जदार ही तिच्या मागणीप्रमाणे शिक्षणाचा व फीचा खर्च मागणेस पात्र आहे का ? | **नकारार्थी** |
| ०४. | अर्जदार ही तिच्या निवा–याच्या सोईसाठी घरभाडे व लाईट पाणीसाठी रक्कम रुपये १०,०००/– मिळण्यास पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| **०५.** | अर्जदार ही तिच्या मागणीप्रमाणे संरक्षणात्मक आदेश मिळणेस पात्र आहे काय? | **नकारार्थी** |
| **०६.** | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**<u>कारणमीमांसा</u>**

**<u>मुद्दा क्रमांक–१ करीता–</u>**

०३. अर्जदार आणि जाबदार यांचे परस्परविरोधी कथने पाहता खालीलप्रमाणे बाबी वादातीत नाहीत.

१. अर्जदार व जाबदार नं. १ यांचा विवाह दिनांक ०४.१२.२०२२ रोजी सांगली येथे झाला.

२. अर्जदार व जाबदार यांचेतील नातेसंबंध

वरीलप्रमाणे बाबी या वादातीत नसल्याने त्यांच्या शाबीतीची गरज नाही. यातील अर्जदार हिने जाबदार यांचेवर कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केल्याचा आरोप ठेवलेला असून, सदरचा आरोप जाबदार यांनी नाकारलेला आहे. त्याअनुषंगाने प्रथमदर्शनी अर्जदार हिची कथने पाहणे योग्य ठरेल.

०४. अर्जदार हिने कथन केलेले आहे की, अर्जदार व जाबदार नं. १ यांचा विवाह पसंतीकार्यक्रमाने निश्चित झाला होता. त्यावेळी जाबदार याने काही दिवसांनी लग्न करणार आहे, त्यामुळे थांबावे असे सांगितले होते. दरम्यानच्या कालावधीमध्ये अर्जदार व जाबदार नं. १ हे एकमेकांशी संपर्कात होते. तसेच ते एकमेकांना भेटत होते, तसेच फिरायला जात होते. तसेच अर्जदार हिचे नर्सिंगचे शिक्षण झाले होते. त्यावेळी तिला पुढील शिक्षण घेण्याची इच्छा तिने जाबदारकडे व्यक्त केली होती. त्यावेळी जाबदार याने पुढील शिक्षणास मदत करेन तसेच

इच्छेप्रमाणे शिक्षण घे असा शब्द दिला होता. पुढे तिने कथन केलेले आहे की, अर्जदार हिच्या शिक्षणाचा खर्च जास्त असल्याने तिने भविष्यामध्ये नोकरीतून थोडे पैसे कर्तव्य म्हणून वडीलांना देणेची इच्छा व्यक्त केली. त्यावेळी जाबदार यांनी त्यास नकार दिला व अर्जदार हिच्या पैश्यावर केवळ त्यांचा अधिकार असेल आणि ते मान्य नसेल तर लग्न मोडले असे समजा अशी भाषा केली. त्यानंतर पुढे कथन केलेले आहे की, अर्जदार हिने प्रेमापोटी भविष्यात आर्थीक मदत न करणेचा हट्ट नाईलाजाने मान्य केला. त्यानंतर पुन्हा मध्यस्थांमार्फत मध्यस्थी करुन घरच्यांची लग्नास संमती दिली होती.

०५. त्यानंतर पुढे कथन केले की, लग्नानंतर जाबदार नं. २ व ३ हे जेवण करण्यावरुन, चवीवरुन, उठण्यावरुन, घर कामावरुन अर्जदार हिला बोल लावत होते. त्यावेळी अर्जदार हिने त्याबाबत जाबदार नं. १ यास सांगितले असता जाबदार याने तु सगळे सहन कर, त्यांचे ऐकून घे, असे सांगितले. त्यानंतर दिनांक १८.१२.२०२२ रोजी जाबदार क्र. १ हा कामासाठी पुण्याला गेला. त्यानंतर दर शनिवार व रविवार तो सांगलीला येत असत. पुढे तिने कथन केले आहे की, जाबदार नं. १ हा पुण्याला गेल्यावर जाबदार नं. २ व ३ यांनी अर्जदार हिला मानसिक व शारिरीक त्रास द्यायला सुरुवात केली. त्यानंतर अर्जदार हिने जाबदार यांचेकडे पुढील पदवी प्रवेशाकरीता विचारणा केली असता, त्यावेळी जाबदार यांनी फी कोण भरणार, शिक्षण घ्यायची गरज नाही अशी भाषा वापरुन शिक्षणाला विरोध केला. त्यानंतर दिनांक ३०.१२.२०२२ रोजी जाबदार नं. १ यास पुण्याहून परत येण्यास रात्रीचे २.०० वाजले त्यावेळी अर्जदार हिला झोप लागली होती. त्यावेळी जाबदार नं. १ व २ यांनी नवरा येण्याच्या आधी कशी झोपतेस असे म्हणून भांडण्यास सुरुवात केली. तसेच तिने पुढे कथन केले आहे की, अर्जदार हिला पौष महिन्यामध्ये माहेरी जाणेस देखील परवानगी दिली नाही. तसेच रात्री थंडीत

१२.०० वाजेपर्यंत भांडी घासणे, स्वयंपाक घर पुसणे, लवकर उठुन सर्वांचे पाणी तापवून बाथरुममध्ये नेऊन द्यावे लागत होते. त्यानंतर जानेवारी महिन्यात अर्जदार हिचे पोट दुखु लागले होते. त्यावेळी प्रथमतः जाबदार नं. १ व २ यांनी लक्ष दिले नव्हते. त्यानंतर दुस–या दिवशी जाबदार नं. ३ हे अर्जदार हिला दवाखान्यात घेऊन गेले, त्यावेळी अर्जदार हिची तब्येत खुपच खराब असल्याने तिला माहेरी पोहोचविण्यात आले. त्यानंतर अर्जदार हिच्या वडीलांनी डॉक्टर सन्मुख यांचेकडे अर्जदार हिचेवर औषधोपचार घेतला. सदरच्या कालावधीमध्ये जाबदार यांनी अर्जदार हिची विचारपूस केली नाही, तसेच भेटावयास आले नाहीत.

०६. तसेच पुढे कथन केले आहे की, त्यानंतर अर्जदार ही पुन्हा सासरी आल्यानंतर, जाबदार नं. ३ या अर्जदार हिला "तु आजारपणाची नाटके करतेस" असे म्हणून त्रास दिला. तसेच जाबदार नं. २ व ३ यांनी घरच्यांनी मानपान व्यवस्थीत केले नाही, तुझा राहणीमानाचा खर्च पेलवत नाही, माहेरहून लाख रुपये आण अशी भाषा वापरली. तसेच जाबदार नं. ३ या अर्जदार हिला माहेरहून मानापानाचे सोने माग, सणाला पैसे आण असे म्हणत असे. सदरची बाब अर्जदार हिने जाबदार नं. १ याला सांगितली असता, त्यावेळी जाबदार नं. १ यांनी देखील अर्जदार हिचेच काहीतरी चुकत असेल, त्याचे आईवडील चुकत नाहीत असे सांगितले.

०७. यातील अर्जदार हिने पुढे कथन केले आहे की, दिनांक २६.०१.२०२३ रोजी जाबदार नं. १ हा सांगलीस आला होता, त्यावेळी अर्जदार हिला पित्ताचा त्रास होत असल्यामुळे ती जेवणार नव्हती. त्यावेळी जाबदार नं. १ यांनी भांडण करुन नाटक करु नको असे बोलले, तसेच जाबदार नं. २ व ३ यांनी तुझ्या पेक्षा बाकीच्या सुना फास्ट असतात असे बोलू लागली. त्यानंतर जाबदार नं.

१ यांनी अर्जदार हिला पुण्याला घेऊन जाणेबाबत जाबदार क्र. २ व ३ यांचेशी बोलला असता, त्यावेळी जाबदार नं. २ व ३ यांनी येथील कामे कोण करणार पुण्याला नेलास तर तिच्या मुठीत राहशील असे म्हणून जाबदार नं. २ व ३ यांनी जाबदार नं. १ यास अडविले. त्यानंतर जाबदार नं. १ याने तुला माझा नाही तर, माझ्या घरच्यांचा संसार ओढायचा आहे, तुला आई सांगते ते ऐकावे लागेल, अशी तंबी अर्जदार हिला दिली. त्यावेळी अर्जदार हिने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता, जाबदार नं. १ यांनी अर्जदार व तिच्या घरच्यांना शिव्या दिल्या. त्यानंतर वाद वाढला असता, जाबदार नं. १ यांनी अर्जदार हिला एक थोबाडीत मारुन मानेला पकडून भिंतीवर आदळले. सदरच्या प्रकारामुळे अर्जदार ही खूप घाबरली होती.

०८. अर्जदार हिने पुढे कथन केलेले आहे की, दिनांक ३०.०१.२०२३ रोजी अर्जदार हिच्या मैत्रीणीच्या लग्नासाठी गेल्या असताना, त्यांना तिथे उलटयांचा त्रास झाला. त्यावेळी औषधोपचार घेऊन घरी आल्यानंतर जाबदार यांनी पुन्हा तु नाटक करीत आहेस, काम नको म्हणून नाटक चाललय, असे बोलून दाखविले. त्यानंतर जाबदार नं. २ व ३ यांनी दंगा करुन अर्जदार हिच्या वडीलांना बोलावून घेतले व आत्ताच्या आता इथून चालती हो असे म्हणून अर्जदार हिला हाकलून काढले. त्यानंतर जाबदार यांनी अर्जदार हिची कोणतीही साधी विचारपूस केली नाही. त्यानंतर अर्जदार हिने जाबदार क्र. १ याचे मॅसेजद्वारे/फोनद्वारे भेटण्याचा प्रयत्न करुन देखीलही, जाबदार नं. १ यांनी टाळाटाळ केली. त्यानंतर जाबदार यांनी मध्यस्थांकडे तसेच समुपदेशन केंद्रामध्ये देखील मध्यस्थीसाठी प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर कथन केले की, जाबदार नं. १ यांनी अर्जदार हिला वकिलांमार्फत खोटी नोटीस दिली. त्यास अर्जदार हिने पत्र लिहून नांदवून घेणेबाबत आग्रह व इच्छा व्यक्त करुन देखील जाबदार यांनी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत.

त्यानंतर अर्जदार हि स्वतःहून दिनांक १३.०५.२०२३ रोजी जाबदार याचेकडे नांदावयास गेली असता, जाबदार यांनी तिला घरामध्ये घेतले नाही. त्यामुळे अर्जदार हिने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०९. याऊलट जाबदार यांनी निशाणी १५ प्रमाणे आपले म्हणणे सादर केले असून, अर्जदार हिच्या अर्जातील संपूर्ण कथने अमान्य केलेली आहेत. जाबदार यांनी कथन केलेले आहे की, अर्जदार व जाबदार यांनी एकमेकांना पसंत केले म्हणून अर्जदार व जाबदार यांचे घरचे खुष होते. त्यानंतर सर्व व्यवस्थीत असताना अर्जदार हिचे वडीलांनी मुलीचा नर्सिंग कोर्स झालेला आहे, त्यामुळे लग्न झालेनंतर जेंव्हा नोकरी लागेल तेंव्हा अर्धा पगार माहेरी दयावा लागेल असा बॉण्ड लिहून देणेबाबत बोलले. त्यावेळी जाबदार यांनी अडीअडचणीच्या वेळी अर्जदार ही घरच्यांना मदतच करणार आहे त्यामुळे कोणतीही अट घालू नका असे कळविले. परंतु त्यावेळी अर्जदार ही साधा बॉण्ड लिहून देत नाही मला असला नवरा नको आहे अशी उध्दट बोलली. तसेच पुढे कथन केलेले आहे की, लग्नापूर्वी जाबदार यांनी अर्जदार हिला रक्कम रुपये १०,०००/– चा मोबाईल घेऊन दिला, तसेच ॲडमिशनच्या वेळी रक्कम रुपये १०,०००/– दिली होती. तसेच पुढे कथन केले आहे की, जाबदार हे अर्जदार हिच्या अडी–अडचणीच्या वेळी तिचेसोबत खंबीर उभे राहिले तरी अर्जदार हि त्याची कोणतीही जाणीव न ठेवता बॉण्ड लिहून द्यावा असे उध्दट आणि कृतघ्नपणे वागत होती. त्यामुळे जाबदार नं. १ यांनी नाईलाजाने लग्नास नकार कळविला होता. परंतु त्यानंतर काही दिवसांनी अर्जदार या प्रत्यक्ष भेटून पुन्हा असे वागणार नाही, कोणतीही तक्रार करणार नाही अशी ग्वाही दिली. त्यामुळे जाबदार क्र. १ याने विवाहास संमती दिली. त्यानंतर लग्न झाले व सदर विवाह सोहळयाचा संपूर्ण खर्च जाबदार यांनी केला होता.

१०. तसेच पुढे कथन केलेले आहे की, ज्यावेळी अर्जदार हिला भारती हॉस्पीटलमध्ये नर्सिंगमध्ये जॉब करायची संधी होती त्यावेळी जाबदार यांनी त्यांचा जॉब पुण्यात असल्यामुळे नवीन जॉब करु नको त्यापेक्षा जिथे आहे तिथेच जॉब कर असे सांगितले होते. परंतु जाबदार यांना समजून आले की, अर्जदार हिला केवळ सांगलीमध्येच नोकरी करुन तिच्या पगारातील पैसे तिच्या आईवडीलांना दयायचे. तसेच अर्जदार हिला केवळ तिचे आईवडील,भाऊ व बहिणींची काळजी होती व त्यांना जाबदार यांची कधीही काळजी नव्हती. त्यामुळे अर्जदार हिने केवळ जाबदार यांना मानसिक त्रास व्हावा या उद्देशाने प्रस्तुतच्या अर्जामध्ये खोटया रचना केलेल्या आहेत. तसेच पुढे कथन केले आहे की, जाबदार यांनी कधीही,केंव्हाही व कुठेही अर्जदार हिचेशी चुकीच्या पध्दतीने वागलेले नव्हते व नाहीत. तसेच जाबदार नं. ३ हिने अर्जदार हिला मुलीप्रमाणेच वागणूक दिलेली असून, त्या तिला स्वतःच्या मुलीप्रमाणे मानत होत्या व आहेत. तसेच पुढे कथन केले आहे की, अर्जदार ही केवळ छोटया छोटया कारणावरुन जाबदार यांच्या घरातील थोरामोठयांसोबत उध्दट बोलत होती. तसेच वास्तविकता अर्जदार ही जाबदार यांचेसोबत काही दिवसच राहिलेली असून, तिला जाबदार यांचे कुटुंबियांच्यासोबत राहणेस कोणतेही स्वारस्य कधीही नव्हते व नाही. त्यामुळेच जाबदार नं. १ यांनी अर्जदार हिला वेळोवेळी समजावून सांगून, मध्यस्थामार्फत निरोप देऊन नांदणेस येणेकरीता विनंती केली, परंतु त्यास यश आले नाही. म्हणूनच जाबदार यांनी अर्जदार हिला कायदेशीररित्या नोटीस देऊन कौटुंबिक न्यायालयात अर्ज दाखल केला. तसेच पुढे कथन केले आहे की, अर्जदार हिला जाबदार नं. १ यास वैवाहिक सुखापासून वंचित ठेवले असून अर्जदार हिच्या कृत्यामुळे जाबदार यांचे शारिरीक व मानसिक खच्चीकरण झालेले आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

११. यातील अर्जदार आणि जाबदार यांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप

केलेले असून सदरची बाब पुराव्याअंती शाबीत करण्याची जबाबदारी ही दोन्ही पक्षकारांवर आहे. सद्यपरिस्थीतीत अर्जदार हिच्या अर्जातील कथनांचा विचार करीता, लग्नानंतर जाबदार नं. २ व ३ यांनी अर्जदार हिला जेवण करण्यावरुन,उठण्यावरुन, घरकामावरुन वारंवार बोल लावत असल्याचे कथन केलेले आहे. तसेच जाबदार नं. २ व ३ यांनी घरातील सर्व कामे अर्जदार हिला एकटीला करायला लावत असलेबाबत कथन केलेले आहे. सदरची बाब अर्जदार हिने जाबदार नं. १ याला सांगितली असता, जाबदार नं. १ याने जाबदार नं. २ व ३ यांचे ऐकूण घेणेबाबत व सहन करणेबाबत सांगितले. तसेच अर्जदार हिने कथन केलेले आहे की, जाबदार यांनी लग्नानंतर पुढील पदवी प्रवेशाबाबत व शिक्षण घेणेस विरोध दर्शविला. त्याचप्रमाणे जाबदार नं. ३ हिने लग्नामध्ये मानपान केला नाही. माहेरहून सोने, पैसे आण असे म्हणत असल्याचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे अर्जदार हि आजारी असताना तसेच ती माहेरी असताना तिची कोणतीही विचारपूस जाबदार यांनी केली नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच जाबदार क्र. १ यांनी नेहमी जाबदार क्र. २ व ३ यांची बाजू घेतल्याचे व जाबदार क्र. २ व ३ यांचे ऐकून घे असे सांगितल्याचे कथन केलेले आहे. तसेच जाबदार नं. १ यांनी अर्जदार हिला शिवीगाळ करुन, थोबाडीत मारुन, मानेला पकडून भिंतीवर आदळल्याची कथन केलेले आहे. तसेच अर्जदार हिला हाकलून काढलेपासून जाबदार यांनी तिला नांदविणेसाठी कोणताही प्रयत्न केला असल्याचे तसेच तिची कोणतीही विचारपूस केली नसल्याचे कथन केलेले आहे.

१२. याऊलट जाबदार यांनी अर्जदार हिची कथने नाकारलेली असून, अर्जदार हिने जाबदार यांचेसोबत राहणेस कोणतेही स्वारस्य नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच जाबदार यांनी कथन केलेले आहे की, लग्नापूर्वीपासूनच अर्जदार व तिच्या घरच्यांची अर्जदार हिला जॉब लागलेनंतर मिळणा–या पगाराची अपेक्षा

होती व तसा बॉन्ड लिहून देणेबाबत त्यांनी कळविले होते. तसेच पुढे कथन केलेले आहे की, लग्नानंतर अर्जदार हि जाबदारांच्या घरातील थोरामोठयांसमोर उध्दट बोलने, छोटया छोटया कारणांवरुन भांडणतंटा करणे असे प्रकार करीत होती. तसेच अर्जदार ही तिच्या माहेरच्यांचे म्हणणे मानत असे व तिला माहेरी राहून माहेरच्या लोकांची काळजी होती. तसेच कथन केलेले आहे की, जाबदार यांनी कधीही अर्जदार हिच्यावर शारिरीक व मानसिक त्रास व छळ केला नव्हता.

१३. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम ३ मध्ये कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या विषद केलेली असून त्यामध्ये शारीरिक छळ, लैंगिक छळ, शाब्दीक व मानसिक छळ आणि आर्थीक छळ विषद केलेले आहेत. यातील अर्जदार हिच्या कथनांचा एकंदरीत विचार करीता यातील जाबदार यांनी तिला घरातील कामावरुन तसेच जेवणावरुन बोल लावल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच अर्जदार ही आजारी असताना तसेच माहेरी असताना तिची कोणतीही विचारपूस केली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच अर्जदार हिच्या पुढील शिक्षणाबाबत विरोध केल्याचे देखील प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच अर्जदार हिला जाबदार नं. १ यांनी मारहाण, शिवीगाळ केल्याचे देखील दिसून येते. यातील जाबदार यांनी अर्जदार हिचे सर्व आरोप नाकारलेले आहेत. यातील जाबदारतर्फे वकिलांनी युक्तीवादादरम्यान अर्जदार हिने स्वतः पाठविलेल्या नोटीशीकडे लक्ष वेधले व कथन केले की, यातील अर्जदार हिने सदरच्या नोटीसीमध्ये काही बाबी स्वतः कबूल केलेल्या आहेत. परंतु सदरच्या बाबी या अर्जदार हिने परस्परविरोधी कथन केलेल्या आहेत. यावरुन अर्जदार ही स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे. यातील जाबदार यांनी अर्जदार ही दिनांक ०७.०५.२०२३ रोजी नांदणेस येणेबाबत नोटीस पाठविल्याचे दिसून येते. सदरच्या नोटीशीस अर्जदार हिने स्वतः

दिनांक २२.०५.२०२३ रोजी नोटीस पाठवून नांदणेस येणेस तयार असल्याचे कळविल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये, ती स्वतःहून दिनांक १३.०५.२०२३ रोजी जाबदार यांच्याकडे नांदावयास गेली असता, जाबदार यांनी तिला घरात न घेता तिच्या अंगावर धावून आले, त्यामुळे तिला माघारी यावे लागले असल्याचे कथन केले आहे. जाबदार यांनी नांदावयास येणेबाबत नोटीस दिल्यानंतर घटस्फोटाची केस दाखल केल्याचे दिसून येते. जाबदार यांच्या एकंदरीत कथनावरुन त्यांनी नांदवण्यासाठी काय प्रयत्न केले याबाबत स्पष्टोक्ती दिसून येत नाही. यातील अर्जदार ही जाबदार नं. १ याची पत्नी असून तिच्या उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी ही जाबदार नं. १ यांचेवरच आहे. यातील जाबदार यांनी अर्जदार ही नोकरी करीत असल्याचे कथन केलेले आहे. परंतु सदर कथनांबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा दिलेला नसून सदरची बाब ही अर्जाचे पुराव्याचे कामी पुराव्याअंती शाबीत करणेस जाबदार यांना संधी आहे. यातील अर्जदार हि दिनांक ३०.०१.२०२३ पासून माहेरी राहत असून अर्जदार ही माहेरी राहत असलेपासून आजतागायत तिच्या उदरनिर्वाहाकरीता कोणतीही व्यवस्था जाबदार यांनी केल्याचे दिसून येत नाही. हा देखील एक आर्थीक कौटुंबिक हिंसाचाराचा भाग आहे. सद्यपरिस्थीतीत अर्जदार हिच्या एकंदरीत कथनांवरुन जाबदार यांनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक–२ करीता–</u>**

१४. यातील अर्जदार हिने तिचे पालनपोषण करणेकरीता, कपडेलत्ता, औषधपाणी याकरीता म्हणून रक्कम रुपये २५,०००/– इतकी अंतरीम पोटगीची मागणी केलेली आहे. तसेच जाबदार याची आर्थीक परिस्थीती चांगली असून, त्याला प्रतिमहिना रक्कम रुपये ६०,०००/– इतके उत्पन्न मिळत असल्याचे कथन

केलेले आहे. याउलट जाबदार यांनी जाबदार नं. १ हे सध्या खाजगी स्वरुपाची नोकरी करीत असून, त्याचेवर जाबदार नं. २ व ३ यांच्या औषधोपचाराची जबाबदारी असल्याचे कथन केलेले आहे. तसेच जाबदार नं. १ याचेवर कर्जाचा बोजा असून तो फेडण्याची जबाबदारी असल्याचे कथन केलेले आहे. तसेच अर्जदार ही सध्या नर्सींगची नोकरी करीत असून, तिला त्यापासून ३५ ते ४० हजार इतका पगार असल्याचे कथन केलेले आहे.

१५. यातील अर्जदार व जाबदार नं. १ यांनी आपले मालमत्ता व दायित्व शपथपत्र दाखल केलेले असून, त्याचे अवलोकन केले. अर्जदार हिने तिला दरमहा रक्कम रुपये २५,०००/- इतका खर्च असल्याचे नमूद केले असून, जाबदार यास दरमहा ६५,०००/- इतका पगार मिळत असल्याचे कथन केलेले आहे. तसेच अर्जदार हिने निशाणी १९/१ खाली जाबदार यास कंपनीने दिलेले ऑफर लेटरची प्रत दाखल केलेली असून, सदरच्या लेटरमध्ये जाबदार यास प्रतिवर्षी रक्कम रुपये ५,५०,०००/- इतका पगार हा कंपनीकडून प्रस्तावित झाल्याचे नमूद केलेले आहे. याऊलट जाबदार नं. १ यांनी त्याला दरमहा रक्कम रुपये ४४,०००/- इतका पगार मिळत असल्याचे कबूल केलेले आहे. तसेच त्याने जाबदार नं. २ व ३ यांच्या औषधोपचाराकरीता दरमहा रक्कम रुपये १०,०००/- इतका खर्च असल्याचे नमूद केलेले आहे. परंतु त्याचे पृष्ठयर्थ कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच जाबदार नं. १ यांनी त्याचेवर एच.डी.एफ.सी. बँकेचे रक्कम रुपये २३,४०,०००/- इतके कर्ज असल्याचे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे बँकेचा कर्जाचा हप्ता हा २०,०००/- आणि मोबाईलचा हप्ता हा दरमहा रक्कम रुपये १४००/- इतका भरीत असल्याचे कथन केलेले आहे. परंतु जाबदार यांनी त्यापृष्ठयर्थ कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्याचप्रमाणे जाबदार नं. १ यांनी अर्जदार हि नोकरी करीत असून तिला दरमहा १५,०००/- पगार मिळत

असल्याचे कथन केलेले आहे. परंतु त्यासंदर्भात कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अगर कागदपत्रे सादर केलेली नाहीत.

१६. यातील जाबदार नं. १ याने त्याला दरमहा रक्कम रुपये ४४,०००/– इतका पगार असल्याचे शपथपत्रामध्ये नमूद केलेले आहे. तसेच अभिलेखावरील कंपनीचे ऑफर लेटर पाहता जाबदार नं. १ यास प्रतिवर्षी ५,५०,०००/– पगार ऑफर केल्याचे दिसून येते. यावरुन जाबदार नं. १ यास दरमहा साधारणतः रक्कम रुपये ४५,०००/– इतका पगार ऑफर केल्याचे दिसून येते. सद्य परिस्थीती जाबदार नं. १ यांनी त्यास रक्कम रुपये ४४,०००/– इतका पगार मान्य व कबूल केलेला असल्याने त्यास दरमहा निश्चित उत्पन्न मिळत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

१७. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे जाबदार नं. १ याने त्याचा जाबदार नं. २ व ३ यांच्या औषधोपचाराचा खर्च तसेच कर्जाचे हप्ते देत असल्याचे कथन केले असले तरी त्याबाबत तपशिलवार वर्णन अगर कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच अर्जदार ही नोकरी करीत असलेबाबत व तिला दरमहा उत्पन्न मिळत असलेबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. तसेच अर्जदार हिने तिच्या शपथपत्रामध्ये जाबदार यांचे घर व फ्लॅट असल्याचे कथन केलेले आहे. सदरची बाब जाबदार यांनी नाकारलेली नाही. यातील अर्जदार हिचे जरी नर्सींगचे शिक्षण झालेले असले तरी तिला उत्पन्नाचे साधन नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वर नमूद केलेप्रमाणे अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची संपूर्ण जबाबदारी ही जाबदार नं. १ याचेवर असल्याने अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाकरीता अंतरिम पोटगी मंजूर करणे क्रमप्राप्त वाटते. जाबदार नं. १ याला मिळणा–या उत्पन्नाचा विचार करता तसेच त्याचेवरील जबाबदारीचा विचार करता सद्य परिस्थीतीत अर्जदार व जाबदार यांच्या

राहणीमानाचा विचार करता जाबदार नं. १ यास अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाकरीता म्हणून दरमहा रक्कम रुपये ७,०००/– इतकी अंतरिम पोटगी मंजूर करणे योग्य वाटते. सबब मी मुद्दा क्रमांक ०२ करीता अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक–३ करीता–</u>**

१८. यातील अर्जदार हिने शिक्षणाच्या व फीचा खर्च म्हणून रक्कम रुपये १,५०,०००/– इतका प्रतिवर्षीप्रमाणे देणेबाबत विनंती केलेली आहे. याऊलट जाबदार यांनी अर्जदार हिच्या शैक्षणिक कामाकरीता तसेच हौस मौज करीता मोठा खर्च केलेला असल्याचे कथन केलेले आहे. यातील अर्जदार हिने तिच्या शिक्षणाकरीता व फीच्या खर्चाकरीता म्हणून रक्कम मिळणेविषयी विनंती केली असली तरी अर्जदार हिने त्यासंदर्भात ती कोठे शिक्षण घेते, तिची शैक्षणिक फी किती याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सद्यपरिस्थीतीत सादर केलेला नाही. त्यामुळे सदरची मागणी ही पुराव्याअंती मान्य करता येऊ शकते. त्यामुळे सद्यपरिस्थीतीत मी मुद्दा क्रमांक ३ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक–४ करीता–</u>**

१९. यातील अर्जदार हिने तिच्या निवा–याच्या सोईसाठी घरभाडे व लाईट पाणीसाठी म्हणून रक्कम रुपये १०,०००/– इतके देणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच अर्जदार हिने तिचे शपथपत्रामध्ये तिला दरमहा रक्कम रुपये १०,०००/– इतके घरभाडे लागू शकेल असे कथन केलेले आहे. याऊलट जाबदार यांनी अर्जदार हिच्या वडीलांची स्वतःचे बांधीव आरसीसी घर असल्याचे कथन करुन अर्जदार हिला स्वतंत्र भाडयाने राहण्याची गरज नसल्याचे कथन केलेले आहे. अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहत आहे ही बाब वादातीत नाही. अर्जदार हिने तिला घरभाडे म्हणून रक्कम रुपये १०,०००/– प्रतिमहिना

मिळणेबाबत विनंती केली असली तरी अर्जदार हिने भाडयाने राहण्याकरीता चौकशी केली साधारण भाडे किती दयावे लागेल याबाबत प्रथमदर्शनी पुरावा सादर केलेला नाही. त्याचप्रमाणे अर्जदार हिची सदरची मागणी ही देखील पुराव्याअंती मान्य करता येऊ शकते. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक ४ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्रमांक–५ करीता–</u>

२०. यातील अर्जदार हिने जाबदार यानी तिचा पुन्हा शारीरिक व मानसिक छळ करुन घरगुती अत्याचार करु नये असा प्रतिबंधात्मक आदेश मिळणेविषयी विनंती केली आहे. याऊलट जाबदार यांनी त्यांनी कधीही अर्जदार हिचेवर घरगुती हिंसाचाराचे कृत्य केले नसल्याचे कथन केलेले आहे. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे जाबदार यांनी अर्जदार हिचेवर घरगुती हिंसाचाराचे कृत्य केल्याचे प्रथमदर्शनी शाबीत झाल्याचे नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे अर्जदार ही जाबदार यांचेपासून दिनांक ३०.०१.२०२३ रोजीपासून वेगळी राहत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदरची मागणी ही अंतिम पुराव्यातअंती विचारात घेतली जाऊ शकते. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक ५ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्रमांक–६ करीता–</u>

२१. वर नमूद केल्याप्रमाणे जाबदार यांनी अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केल्याची बाब प्रथमदर्शनी शाबीत होते. त्याचप्रमाणे जाबदार नं. १ याने अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही सोय अथवा व्यवस्था केली नसल्याचे दिसून येते. तसेच जाबदार नं. १ याची अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची व पालनपोषणाची व्यवस्था करणेइतपत आर्थीक क्षमता असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार ही निश्चितपणे जाबदार नं. १ याचेकडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे.

अर्जदार हिने जाबदार याचेकडून इतर मागण्या देखील केलेल्या असून त्या पुराव्याअंती मान्य करता येतील. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| २ | जाबदार क्र.१ याने अर्जदार हिला अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रुपये ७,०००/- (अक्षरी सात हजार रुपये फक्त) इतकी मुख्य अर्ज निकाली लागेपावेतो प्रस्तुतचा अर्ज दाखल केले तारखेपासून द्यावी. |
| ३ | सदर आदेशाची प्रत अर्जदार हिला विनामुल्य देण्यात यावी. |

ANIRUDHA SUNIL RANE Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

(अनिरुध्द एस. राणे)

दि.२८.०८.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज.